**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT III-2023-24**

**GRADE: VII** | **MARKS: 50**
**SUBJECT: MARATHI** | **TIME: 2HRS**

**विभाग -अ (गद्य-पद्य)**

**प्र.१.अ) खालील पठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

आईला मदत म्हटल्यावर सोनालीला शाळेत बाईंनी सांगितलेले आठवले. 'आपण सर्वांना मदत केली पाहिजे. या मदतीची सुरुवात घरापासून करा. मदत करण्याने आपल्याला तर आनंद होतोच; पण दुसऱ्याचा आनंद हा आपल्याला समाधान देऊन जातो. तुम्ही घरी किंवा इतर ठिकाणी कोणकोणती मदत करता, त्याची नोंद ठेवा आणि ती दर शनिवारी दाखवा.'सोनालीने आतापर्यंत बऱ्याच नोंदी वहीत केल्या होत्या. आईला मदत, ही एक नवीन नोंद होईल, बाईदेखील सगळ्यांसमोर आपले कौतुक करतील,शाबासकी देतील या विचाराने तिने पटकन 'हो' म्हणून आईच्या हातातले पुस्तक घेतले.आईने तिला दिलेल्या पुस्तकात छोट्या छोट्या कथा होत्या. नुसत्या कथांची नावे वाचून कोणती कथा निवडावी हे तिला कळेना. शेवटी तिने नाइलाजाने एक-एक करून जवळ जवळ दहा कथा वाचल्या. अवघ्या एक-दीड तासात सारे पुस्तक वाचून झाले.

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)

१)बाईंनी या दोन मदतीची नोंद करायला सांगितली
→ [ ] → [ ]

प्र.२) चौकट पूर्ण करा. (३)

१)मदतीची सुरुवात इथून करावी→ [ ]
२)सोनालीने आईच्या हातातले घेतलेले → [ ]
३)दुसऱ्याचा आनंद आपल्याला देऊन जातो → [ ]

प्र.३) सोनालीने आईच्या हातातले पुस्तक पटकन का घेतले? (एका वाक्यात उत्तर लिहा.) (१)

प्र.४) सोनालीने आत्तापर्यंत बऱ्याच_____ वहीत केल्या होत्या. (रिकामी जागा भरा) (१)

**प्र.१.आ. खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे कवितेतून शोधून लिहा.** (७)

सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर
त्यांतून काही हळवे हळवे राहत होते स्वर

घरात होता, काना-मात्रा-वेलांटीचा मेळ
एकोप्याने खेळायाचे सगळे अक्षर-खेळ
विरामचिन्हांचीही होती सोबत वरचेवर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

एखादयाची धुसफुससुद्धा हवीहवीशी छान
प्रत्येकाला अर्थ वेगळा सुखदुःखाचे भान
मधले अंतर कुरवाळाया रेघांचे छप्पर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

कानोकानी कुजबुजताना अंकुर मनकोवळा
वाट मोकळी होऊन लागे कवितेचाही लळा
अवतीभवती झिरपत राही गाणे काळीजभर
सुंदर सुंदर शब्दांचे सुंदर सुंदर घर

प्र.१)चौकट पूर्ण करा. (२)

१) हळवे काय आहे→ [ ]

२) विरामचिन्हांची असते→ [ ]

प्र.२)एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) कवितेचा लळा कसा लागतो?

२) शब्दांच्या घरात कोण कोण एकत्र राहतात ?

प्र.३) यमक जुळणारे शब्द लिहा.(कोणतेही एक जोडी) (१)

प्र.४) कविता पूर्ण करा. (२)

सुंदर सुंदर_____सुंदर_____
त्यातून काही _____राहत होते_____

**प्र२.अ) खालील अपठित गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** **(६)**

पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे (संत पुरुषाचे) पवित्र स्थान आहे. या दरगाहला मुस्लिमांच्या इतकेच किंबहुना जास्तच हिंदू भक्त आहेत. सगळ्या पंचक्रोशीतून सर्व जाती धर्मांचे लोक नारळ, मलिदा,पेढे, खडीसाखर, उदबत्ती घेऊन सजून-धजून स्त्रिया, मुलाबाळांसह दर्शनाला येतात. प्रचंड गर्दी असते.नारळाचा ढीग पडतो, मलिदा, पेढे घेता घेता आणि अंगारा देता देता मुजावर घामाघुम होतात. मुस्लिमांच्या मन्नतबरोबर हिंदूंच्या नवसाच्या तोरणांनी दरगाहचा छत भरून जातो. धुपाचा सुगंधी धूर, चंदनाचा वास, उदबत्ती आणि निशिगंधाचा दरवळ- एक वेगळंच वातावरण असतं. मोठ्या बांधीव ओवऱ्या मला खूप आवडत असत. उरुसातील खेळणी, पाळणे, मिठाईची दुकाने, आरास, नवीन कपडे, जरीच्या रिबीनी, मेळे,पन्हाळ्याची लाल-लाल माती, हिरवीगार हिरवाई,गार-गार हवा- जीव या उरूसाच्या वैशिष्ट्यांनी वेडा होऊन जात असे.

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१) हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे स्थान -_____

२) मुस्लिमांच्या मन्नतबरोबर कशाच्या तोरणांनी दरगाहचा छत भरून जातो-_____

प्र.२) एका वाक्यात उत्तरे लिहा. (२)

१) सगळ्या पंचक्रोशीतून लोक कशाप्रकारे दर्शनासाठी येत?

२) उरूसाची वैशिष्ट्ये लिहा.

प्र.३) रिकामी जागा भरा. (१)

१)अंगारा देता देता _____ घामाघुम होतात.

प्र.४)पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे_______
(वाक्य पूर्ण करा.) (१)

**प्र.२.आ) खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.(कोणतेही ४)** **(८)**

१) शब्दांचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

२) 'वाचनाचे फायदे काय' हे तुमच्या शब्दात लिहा.

३) 'सोनालीला आता पुस्तके वाचत जा' असे सांगण्याची गरज का उरली नाही?

४) पंडिता रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये सांगा.

५) पंडिता रमाबाई 'कष्टाळू' व 'काटकसरी' होत्या हे कोणत्या प्रसंगातून जाणवते.

**विभाग-ब, व्याकरण**

**प्र.३) सूचनेनुसार कृती करा.** (१२)

**१) खालील अव्ययचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य बनवा.** (१)

१) शाब्बास!

**२) खालील वाक्यातील अव्यय ओळखा.** (२)

१) माझ्यासाठी तू काय आणलेस?

२) राम आणि लक्ष्मण हे दोघे भाऊ होते.

**३)खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा.** (२)

१) टीव्ही, व्हिडिओ गेम्स, कम्प्युटर, मोबाईल या सर्वांशी मुलांची नक्की मैत्री होते.

२) "आपण सर्वांना मदत केली पाहिजे", असे पंडिता रमाबाई म्हणाल्या.

**४) खालील वाक्यांचा काळ ओळखा.** (२)

१) घरासमोर तीन खुर्च्या ठेवल्या होत्या.

२) आम्ही इंटरनेटवरून माहिती मिळवतो.

**५) समानार्थी शब्द लिहा.** (१)

१) कथा -

**६) विरुद्धार्थी शब्द लिहा** (१)

१) विधवा ×

**७) वाक्प्रचाराचा अर्थ लिहा.** (१)

१) नोंदी करणे -

**८) अर्थपूर्ण शब्द तयार करा.(चार शब्द).** (२)

१) ऊनसावली

**विभाग क, लेखन विभाग** (१०)

**प्र.४.अ) खालील विषयावर निबंध लेखन करा.** (६)

१) माझे घर

**प्र.४.आ) १)पत्रलेखन करा.** (४)

१) 'चुस्त तंदुरुस्त खेळ साहित्य भांडार', आग्रा रोड, दिल्ली. या कंपनीच्या व्यवस्थापकांना आपल्या शाळेच्या खेळ विभागासाठी खेळाचे साहित्य मागवण्याबाबत पत्र लिहा.

किंवा

**प्र.४.आ) खालील विषयावरून अर्थपूर्ण कथा लिहा व तात्पर्य तुमच्या शब्दात लिहा.** (४)

'खरी दोस्ती'